प्रेसनोट

स्थानीक गुन्हे शाखा, जळगाव
दि.०८/०५/२०२५.

प्रति,

मा.संपादक

---

विषय :- चारचाकी वाहन चोरी करणारी अंतरराज्यीय टोळी स्थानीक गुन्हे शाखा जळगाव कडुन जेरबंद.

जळगाव शहरात एप्रिल २०२५ च्या पहील्याच आठवडयात दिंनाक ०७/०४/२०२५ च्या मध्यरात्री शहरातील प्रतिष्टीत लोकांची एकाच रात्रीतुन ०३ महागडी चारचाकी वाहने चोरी झाले होते.बाबत रामानंद नगर, जळगाव तालुका, जिल्हा पेठ पोलीस टाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले होते.सदर बाबत मा.पोलीस अधीक्षक श्री महेश्वर रेडडी सो यांनी स्थानीक गुन्हे शाखा जळगाव यांना नमुद गुन्हयाबाबत तपासाचे आदेश दिले होते.

नमुद गुन्हयाचा समांतर तपास स्थानीक गुन्हे शाखा जळगाव व संबंधीत पोलीस टाण्याकडुन चालु असतांना, पोलीस उपनिरीक्षक शरद बागल यांनी मोजक्या साथीदार पोलीस कर्मचारी यांना सोबत घेऊन सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरु केले..परंतु काहीही टोस माहीती प्राप्त होत नव्हती. नमुद गुन्हयाच्या अनुशंगाने पोलीस उपनिरीक्षक शरद बागल यांनी वाहनाबाबत माहीती त्यांच्या गोपनीय सुत्रधार यांना वितरीत केली व गोपनीय सुत्रधार यांच्याकडुन इत्यंभुत माहीती काढली व मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे व मोबाईल क्रंमाकाचे तांत्रीक विश्लेषण करुन, ०३ पोलीस कर्मचारी सोबत घेऊन राजस्थान राज्य गाठले व मा.पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधीक्षक जालोर जि.जालोर राजस्थान यांची भेट घेऊन, तेथील स्थानीक पोलीसांच्या मदतीने गुन्ह्यातील ०२ आरोपीतांना ताब्यात घेतले परंतु नमुद आरोपीत हे वाहनाबाबत कोणत्याही प्रकारची माहीती देत नसल्याने, त्यांच्याकडे अधिक चौकशी करणे गरजेचे होते परंतु अद्यापपावेतो गुन्हयातील चोरी झालेली वाहने पोलीसांना प्राप्त झाली नव्हती पण आरोपींना अटक करुन चोरी झालेली वाहने ताब्यात घेणे गरजेचे होते. पोलीस उपनिरीक्षक शरद बागल यांनी नमुद आरोपीताकडुन आणखी त्यांचे ०२ साथीदार यांची माहीती प्राप्त केली व तपास पथकातील सफौ.अतुल वंजारी, पोहवा/०२ हरीलाल पाटील यांना ताब्यात घेतलेले ०२ आरोपींना जळगाव येथे घेऊन जाण्याचे आदेशीत केले.

पोलीस उपनिरीक्षक शरद बागल व पोहवा/९८२ विजय पाटील हे दोन जण सांचोर ता.साचोर जि.जालोर राजस्थानच्या रणांगणात ठाण मांडुन बसले होते.नमुदचे ठिकाण हे वालुकामय व विरळ वस्तीचे होते.तेथे चोरी झालेले वाहने शोधणे आव्हानात्मक व खुपच जिकरीचे होते.परंतु आरोपीकडुन प्राप्त इतर दोन साथीदारांच्या माहीतीच्या आधारे तांत्रीक विश्लेषण करुन, पोलीस उपनिरीक्षक शरद बागल व पोहवा/९८२ विजय पाटील यांनी रणरणत्या उन्हात रात्रदिवस चोरी झालेल्या वाहनांचा व इतर ०२ साथीदारांचा शोध सुरु केला त्यात पोलीस उपनिरीक्षक शरद बागल यांना गोपनीय माहीती प्राप्त झाली की, गुन्हयातील चोरी झालेली टोयाटो कंपनीची इनोव्हा क्रिस्टा गाडी सांचोरच्या जंगलातुन स्थानीक सांचोर पोलीस टाण्याच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने पोउपनिरी शरद बागल व पोहवा/९८२ विजय पाटील यांनी बेवारस स्थितीत ताब्यात घेऊन, नमुद वाहनाचे फोटो फिर्यादीस पाठविले असता, फिर्यादीने ते वाहन त्याचेच असल्याचे ओळखले. म्हणुन सदरचे वाहन रामानंद नगर पोलीस स्टेशन जळगाव यांच्या गुन्हयातील चोरी झालेले वाहन टोयाटो इनोव्हा क्रिस्टा हे स्वता जवळपास १००० किलोमीटर जालोर राजस्थान ते जळगाव असे वाहन चालवित पोउपनिरी शरद बागल व पोहवा/९८२ विजय पाटील यांनी जळगाव शहरात आणले आहे. सदरचे वाहन व आरोपीत हे संबंधीत पोलीस टाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

**सदरची कारवाई हि मा.पोलीस अधिक्षकश्री.डॉ महेश्वर रेडडी सो,मा.अपर पोलीस अधिक्षक श्री अशोक नखाते सो, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी,जळगाव उपविभाग श्री.संदिप गावीत सो,यांच्या मार्गदर्शनाखाली मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री बवन आव्हाड सो स्थानीक गुन्हे शाखा जळगाव,पोलीस उपनिरिक्षक शरद बागल,सहा.फौजदार अतुल वंजारी, पोलीस हवालदार/०२ हिरालाल पाटील, पोलीस हवालदार/९८२ विजय पाटील, चालक पोलीस शिपाई महेश सोमवंशी यांच्या पथकाने केली आहे.**

(बवन आव्हाड)
वरीष्ठ पोलीस निरीक्षक
स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव

